**(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर)**

सर्वोच्च न्यायालय अहवाल [१९५०] एस. सी. आर ७४१-७४७

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात (हैदराबाद)

१९५० एस. सी. आर. ७४१

१२ ऑक्टोबर १९५०

कर्जांची सहकारी संस्था

विरुद्ध

नंदलाल

[न्यायमूर्ती मेहरचंद महाजन आणि न्यायमूर्ती आर. एस. नाईक]

सहकारी पतसंस्था कायदा, १३४० एफ., (हैदराबाद), कलम ४२ – निवाडा – निबंधकांकडून दिवाणी न्यायालयात अंमलबजावणीसाठी सूट पाठविला जाणे – निबंधकांचे अधिकार – हप्त्याचा हुकूमनामा – हप्ता भरण्यात कसूर - दिवाणी न्यायालयात संपूर्ण रकमेसाठी

अंमलबजावणी याचिका – निबंधकांचा हप्ते स्वीकारण्याचा आणि दिवाणी न्यायालयाला कार्यवाही थांबवण्याचे निर्देश देण्याचा अधिकार.

सहकारी पतसंस्था कायदा, १३४० एफ., (हैदराबाद) चे कलम ४२ खालीलप्रमाणे तरतूद करते: "निबंधकाने किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने किंवा लवादांच्या समितीने दिलेल्या निर्णयावर कार्यवाही केली गेली नाही, तर निबंधक (अ) त्याने जारी केलेल्या प्रमाणपत्रावर दिवाणी न्यायालयाच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी करून घेऊ शकतो. दिवाणी न्यायालय या निर्णयाला त्याच्या स्वतः दिलेल्या हुकूमनाम्याप्रमाणेच अंमलबजावणी करेल; (ब) महसूल न्यायालय किंवा अधिकाऱ्याच्या माध्यमातून त्या न्यायालयाला किंवा अधिकाऱ्याला प्रमाणपत्र जारी करून त्याची अंबलबजावणी करून घेऊ शकतो."

असे आदेशीत करण्यात आले की, या कलमांतर्गत निबंधक हे हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत हुकुमनामा पारित करणाऱ्या न्यायालयासारख्या पदावर नव्हते आणि त्याच्याकडे अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाचे सर्व अधिकार नाहीत.

संस्थेचा सदस्य आणि संस्था यांच्यात वाद निर्माण झाल्यास आणि कायद्यांतर्गत नियुक्त केलेल्या लवादाने सहा मासिक हप्त्यांमध्ये विशिष्ट रक्कम भरण्यासाठी हुकुमनामा पारित करताना अशी अट घातली की जर कोणत्याही हप्त्याचा  भरणा करण्यात चूक झाली तर संपूर्ण

रक्कम देय होईल आणि कलम ४२ मधील तरतुदीनुसार हा हुकुमनामा निबंधकाच्या प्रमाणपत्रावर दिवाणी न्यायालयात अंमलबजावणीसाठी पाठवण्यात आला होता.

असा निर्णय देण्यात आला की,अदा करावयाचा पहिला हप्ता भरण्यात चूक झाल्यानंतर आणि संपूर्ण हुकूमनाम्याअंतर्गतचे कर्ज सहकारी संस्थेला देणे देय झाल्यानंतर आणि संपूर्ण रकमेच्या वसुलीसाठी त्याची अंमलबजावणी प्रक्रिया करण्यात आल्यानंतर, निबंधकाला पहिल्या हप्त्याची रक्कम स्वीकारण्याचा आणि पुढील कारवाई थांबवण्याचे निर्देश अंमलबजावणी न्यायालयाला देण्याचा कोणताही अधिकार नाही आणि अंमलबजावणी न्यायालयाला निबंधकांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करण्याचा आणि अंमलबजावणी सुरू ठेवण्याचा अधिकार आहे.

संविधानाच्या अनुच्छेद ३७४ (४) अंतर्गत हैदराबाद उच्च न्यायालयाच्या दिनांक २४ आबान १३५६ फ. (फासली कॅलेंडर प्रमाणे तारीख) रोजीच्या दिवाणी अपील क्र. ३७४(४)/१३५६ मधील न्यायनिर्णय आणि हुकुमनामावरून अपील.

अपीलकर्त्यासाठी – देवी पेरशाद.

उत्तरवादींसाठी – अप्पाराव आणि सदा शिवा राव.

न्यायनिर्णयाचा दिनांक १२ ऑक्टोबर, १९५०.

न्यायनिर्णय न्यायमूर्ती महाजन यांनी पारित केला: हे अपील सहकारी पतसंस्था

कायद्यांतर्गत लवादाने पारित केलेल्या हुकुमनामाच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीतून उद्भवते. हे अपील राज्याच्या न्यायिक समितीसमोर सादर करण्यात आले होते आणि आता अनुच्छेद ३७४(४) अंतर्गत आमच्यासमोर सादर करण्यात आले आहे.

राजा नंदलाल हे हुकूमनामाधारक-धनको संस्थेचे चे सदस्य होते आणि त्याचे कर्जदार - ऋणकोही होते. त्यांच्यात आणि संस्थेमध्ये वाद निर्माण झाला आणि अशा संस्थांवर नियंत्रण ठेवणाऱ्या नियमांनुसार हे प्रकरण लवादाकडे पाठवण्यात आले. लवादाने दिनांक १९ मेहर १३५२ फ. (फासली कॅलेंडर प्रमाणे तारीख) रोजी त्याच्या विरोधात रक्कम रू. ८,१००/- समान सहा मासिक हप्त्यांमध्ये सहा टक्के व्याजासह देण्याबाबत हुकूम केला, व पहिला हप्ता अझूर १३५३ फ. (फासली कॅलेंडर मधील महिना) च्या शेवटी देय होता. सहकारी संस्था कायद्याच्या कलम ४२, खंड (ड) च्या तरतुदींनुसार दाई १३५३ फ. महिन्याच्या च्या दुसऱ्या दिवशी, मौलवी मोहम्मद हसन, मददगार नाझीम यांच्या स्वाक्षरीखाली जारी केलेल्या प्रमाणपत्रावर दिवाणी न्यायालयात हुकुमनामा अंमलात आणण्यासाठी पाठवण्यात आला होता. वसूल करण्यायोग्य रक्कम रु. ८,१००/- मुद्दल आणि रु. ६६६-९-० व्याज होते. त्याच दिवशी धनकोने हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी बालदा येथील दिवाणी न्यायालयात रक्कम रुपये १०,३३९-१४-९ च्या वसूलीसाठी अर्ज सादर केला. असा आरोप करण्यात आला होता की अझूर १३५३ एफ (फासली कॅलेंडर मधील महिना) या महिन्यात देय असलेला पहिला हप्ता भरण्यात कसूर केल्यामुळे व्याजासह संपूर्ण रक्कम वसूल करण्यायोग्य झाली होती. अशी विनंती करण्यात

आली होती की अर्जामध्ये तपशीलवार असलेली मालमत्ता जप्त करण्यात यावी. ३ दाई १३५३ एफ. (फासली कॅलेंडर प्रमाणे तारीख) रोजी म्हणजे, अंमलबजावणीसाठी अर्ज सादर केल्याच्या दुसऱ्या दिवशी, ऋणकोने पहिल्या हप्त्याची रक्कम रु. १,०००/- सहकारी संस्थांच्या निबंधकाच्या कार्यालयात भरली आणि हप्त्यासाठी देय असलेली आणखी कोणतीही रक्कम जमा करण्याची इच्छा व्यक्त केली. नाझीमच्या कार्यालयाने उत्तरात सांगितले की त्याने पहिला हप्ता भरण्यात चूक केल्यामुळे संपूर्ण हुकुमनामा देय झाला होता आणि रु. १,०००/- स्वीकारले जाऊ शकत नाहीत. त्यानंतर, तथापि, ५ दाई १३५३ एफ. रोजी, मोहम्मद अहसन, सहाय्यक मददगार नाझीम यांनी, बालदा येथील दिवाणी न्यायालयाला एक पत्र जारी केले, ज्यात म्हटले होते की रक्कम रु. १,०३४/- निझामत सहकारी पतसंस्थांच्या कार्यालयात जमा करण्यात आले आहेत आणि त्यामुळे अंमलबजावणीची कारवाई स्थगित केली जावी किंवा पुढे ढकलली जावी. दिवाणी न्यायालयात पत्र मिळाल्यावर, हुकुमनामा धारकाने (धनकोने) आक्षेप घेतला की निबंधकाला हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याचा अधिकार नाही कारण तो अंमलबजावणी न्यायालय नाही. हा आक्षेप न्यायालयाने फेटाळला आणि असे म्हटले की सहकारी पतसंस्था कायद्याच्या कलम ४२ च्या तरतुदींनुसार निबंधकांनी प्रमाणपत्र जारी केल्यानंतरही हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याचा अधिकार कायम ठेवला आहे. परिणामी अंमलबजावणीच्या कारवाईला स्थगिती देण्यात आली. या आदेशाविरोधात 'सदर (सर्वोच्च) न्यायालयात' (सदर अदालत मध्ये) याचिका दाखल करण्यात आली होती. सदर न्यायालयाने (सदर अदालतने) अपील अंशतः मंजूर केले

आणि असे मत व्यक्त केले की भरणा केलेल्या रकमेबाबत हुकुमनाम्याची अंमलबजावणी केली जाऊ शकत नाही परंतु भविष्यातील हप्त्यांच्या संदर्भात जेव्हा ते देय असतील तेंव्हा त्याची अंमलबजावणी केली जाऊ शकते. न्यायालयास पुढे असे आढळून आले की, हुकुमनाम्यातील पूर्वनिश्चित कलम निबंधकाच्या कार्यालयात पहिला हप्ता जमा केल्यामुळे माफ केले गेले असावे. धनकोने (हुकूमनामा धारकाने) उच्च न्यायालयात दुसरे अपील केले परंतु त्याला कोणतेही ठोस यश मिळाले नाही. उच्च न्यायालयाने असे म्हटले की, पहिला हप्ता भरण्यात चूक झाली होती त्यामुळे हुकुमनामाधारकाला संपूर्ण हुकुमनामा अंमलात आणण्याचा अधिकार होता आणि सहकारी निबंधक किंवा अंमलबजावणी करणारे न्यायालय, धनकोला (हुकुमनामाधारकाला) त्या अधिकारापासून वंचित ठेवू शकत नाही. हा निष्कर्ष असूनसुद्धा उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की निबंधक तरीसुद्धा अंमलबजावणीची कार्यवाही पुढे ढकलण्याचे अधिकारक्षेत्र राखून ठेवतात. मददगार नाझीमने जारी केलेले प्रमाणपत्र बेकायदेशीर असल्याचा न्यायनिर्णित ऋणकोचा युक्तिवाद नाकारला गेला. असे मानले गेले की मददगार नाझीमने या संदर्भात अधिकार सोपवले होते आणि जर काही दोष असेल तर तो नाझीमने स्वतः स्वाक्षरी केलेल्या नवीन प्रमाणपत्राद्वारे दुरुस्त करण्यात येईल. याचा परिणाम असा झाला की, या निष्कर्षांसह अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाचा अंमलबजावणीची कार्यवाही स्थगित करण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला.

या अपीलातील विचार करण्यासारखा पहिला मुद्दा आदेशांच्या

अंमलबजावणीसंदर्भात सहकारी पतसंस्था कायद्यांतर्गत कार्यरत असलेल्या निबंधकांच्या अधिकारक्षेत्राशी संबंधित आहे. या प्रश्नाचा निर्णय सहकारी पतसंस्था कायदा, १३४० एफ. च्या कलम ४२ (ड) मध्ये सुधारित केलेल्या भाषेत वापरल्या जाणाऱ्या अन्वयार्थावर अवलंबून आहे.

हे कलम पुढील प्रमाणे आहे :

"निबंधकाने किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने किंवा लवादांच्या समितीने दिलेल्या निर्णयावर कारवाई केली गेली नाही, तर निबंधक -

(१) त्याने जारी केलेल्या प्रमाणपत्रावर दिवाणी न्यायालयाच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी करू शकतो. दिवाणी न्यायालय या निर्णयाची त्याच्या स्वतःच्या आदेशाप्रमाणेच अंमलबजावणी करेल;

(ब) महसूल न्यायालय किंवा अधिकाऱ्याच्या माध्यमातून त्या न्यायालयाला किंवा अधिकाऱ्याला प्रमाणपत्र देऊन त्याची अंमलबजावणी करू शकतो.

या कलमात वापरलेली भाषा, दिवाणी प्रक्रिया संहितेअंतर्गत हुकुमनामा पारित करणाऱ्या न्यायालयाप्रमाणेच निबंधकाला स्थान देत नाही. संहितेनुसार, हुकुमनामा पारित करणारे दिवाणी न्यायालय हेच हुकुमनाम्याची अंमलबजावणी करणारे न्यायालय असते. त्याला दुहेरी अधिकार आहेत, (१) हुकुमनामा पारित करणाऱ्या न्यायालयाचे आणि (२) अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाचे. असे दिसून येते की, निबंधकाकडे दिवाणी न्यायालयाचे पहिले अधिकार

आहेत, परंतु त्याला दिवाणी न्यायालयाप्रमाणे हुकुमनामा पारित करून हुकुमनाम्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार नाहीत. मात्र निबंधकाला दिलेले अधिकारक्षेत्र असे आहे की, तो प्रमाणपत्र जारी करू शकतो आणि त्या प्रमाणपत्रावर तो दिवाणी न्यायालयात किंवा महसूल अधिकाऱ्याला हुकुमनामा पाठवू शकतो. असे असू शकते की, प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याला प्रमाणपत्र रद्द करण्याचा किंवा दुसरे जारी करण्याचा अधिकार असू शकतो किंवा तो प्रमाणपत्र मागे घेऊन दिवाणी न्यायालयातून अंमलबजावणी कारवाई मागे घेऊ शकतो आणि ते महसूल न्यायालयात पाठवू शकतो आणि त्याउलट कृती करू शकतो. महसूल न्यायालयातुन अंमलबजावणी मागे घेऊन दिवाणी न्यायालयात पाठवू शकतो. कलमाच्या सोप्या भाषेत असे म्हटले जाऊ शकत नाही की निबंधकाचे अंमलबजावणी करणारे न्यायालय स्थापन करण्यात आले आहे किंवा निवाडा हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत कोणतेही अधिकार त्याला देण्यात आले आहेत. हे कलम बनवण्याच्या पार्श्वभूमीवर, निबंधकाने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे दिवाणी न्यायालयात प्रलंबित असलेल्या अंमलबजावणीच्या कार्यवाही दरम्यान हस्तक्षेप करण्याचा अधिकार निबंधकाना होता का, हा प्रश्न विचारार्थ उद्भवतो. हे निश्चित करण्यासाठी निबंधकांनी या प्रकरणात नेमके काय केले हे पाहणे आवश्यक आहे. पहिला हप्ता भरण्यात चूक झाल्यानंतर आणि संपूर्ण हुकुमनामा कर्ज देय झाल्यानंतर आणि रक्कम वसूल करण्यासाठी अंमलबजावणी अर्ज दाखल केल्यानंतर, निबंधकानी पहिल्या हप्त्याची रक्कम स्वीकारली आणि अंमलबजावणी न्यायालयाला पुढील कार्यवाही थांबविण्यास सांगितले. पहिला हप्ता स्वीकारताना

निबंधकानी केलेले कृत्य हे अंमलबजावणी न्यायालयाच्या कर्तव्यांवरील स्पष्ट अतिक्रमण होते. जर हुकूमनामा पारित करणाऱ्या न्यायालयाला त्याची अंमलबजावणी करण्याचेसुद्धा अधिकारक्षेत्र नसेल तर केवळ ज्या न्यायालयात हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीची कार्यवाही हाती घेण्यात आली आहे त्याच अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयात हुकूमनाम्याच्या पूर्ततेकरिता प्रदान केले जाऊ शकते. आधीच सूचित केल्याप्रमाणे, हे अधिकारक्षेत्र निबंधकाकडे नाहीत. असे असल्याने, आमच्या मते, निबंधकाने अंमलबजावणी न्यायालयाला अंमलबजावणीची कार्यवाही थांबवण्याची मागणी करणे आणि पहिला हप्ता स्वीकारण्याची त्याची कृती त्याला प्रदान केलेल्या अधिकारक्षेत्रापेक्षा जास्त होती आणि अंमलबजावणी न्यायालयाकडे त्याकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार होता. शिवाय, या परिस्थितिमध्ये लवादाने पारित केलेल्या हुकुमनाम्यात निबंधक बदल किंवा सुधारणा करू शकत नाही.

सर्व दुय्यम न्यायालयांनी या कलमाचा अर्थ असा लावला आहे की निबंधक हे हुकुमनामा पारित करणारे न्यायालय असून त्याला हुकुमनाम्याची अंमलबजावणी करण्याचे न्यायालयासारखेच अधिकार आहेत. सदर कलमाची स्पष्ट भाषा लक्षात घेता आम्ही या दृष्टिकोनाशी सहमत होऊ शकत नाही. या कायद्याचा अर्थ लावताना दिवाणी न्यायालयांच्या संदर्भात दिलेल्या निर्णयांचे साधर्म्य उपलब्ध नाही. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार, मूळ न्यायालय, म्हणजे, हुकुमनामा पारित करणारे न्यायालय, जरी तो हुकुमनामा अंमलबजावणीच्या उद्देशाने एक किंवा अधिक न्यायालयांमध्ये हस्तांतरित केला गेला असला तरी तो अंमलात आणण्याचे

अधिकारक्षेत्र नेहमीच राखून ठेवते. प्रामुख्याने, जे न्यायालय हुकूमनामा पारित करण्याचे आदेश देते, त्यांची अंमलबजावणी करणे हे त्या न्यायालयाचे कार्य आहे, परंतु जेव्हा त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे त्या न्यायालयास शक्य नसल्याचे आढळून येते तेव्हा ती अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने इतर न्यायालयांमध्ये पाठविण्यास अधिकृत करणारी तरतूद संहितेत करण्यात आली आहे; परंतु यापैकी कोणत्याही तरतुदी कोणत्याही प्रकारे हुकूमनामा पारित करणाऱ्या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रावर, जेव्हा त्याला योग्य वाटेल तेव्हा त्याची अंमलबजावणी करण्याचा आदेश पारित करताना परिणाम करत नाहीत आणि अंमलबजावणी इतर न्यायालयांमध्ये हस्तांतरित करण्याचा आदेश या प्रकरणातील त्याचे अधिकारक्षेत्र काढून घेत नाही. तथापि, निबंधकांच्या बाबतीत स्थिती पूर्णपणे वेगळी आहे. त्याला स्वतःचा हुकुमनामा अंमलात आणण्याचा कोणताही अधिकार देण्यात आलेला नाही. दिवाणी न्यायालय किंवा महसूल न्यायालयाद्वारे त्याची पूर्तता करणे हा त्याला दिलेला एकमेव अधिकार आहे, मात्र त्या उद्देशासाठी प्रमाणपत्र जारी करणे हा त्याला दिलेला एकमेव अधिकार आहे.

आमच्या मते, या प्रकरणातील उच्च न्यायालयाने, स्वतःच्या निष्कर्षांच्या विरोधाभासी निर्णय दिला आहे. असे निर्णित केले आहे की, निबंधकाच्या कार्यालयात न्यायनिर्णित ऋणकोने पहिला हप्ता भरल्यामुळे हुकूमनाम्यातील पूर्वनिश्चित खंड माफ करण्यात आला होता, असे मत बनवून प्रथम अपीलीय न्यायालयाने चूक केली होती, आणि असे सकारात्मकपणे आढळून आले आहे की एकदा कसूर केल्यानंतर निबंधकाला तो माफ करण्याचा

अधिकारक्षेत्र नव्हते आणि धनको हुकूमनाम्याप्रमाणे व्याजासह संपूर्ण रकमेसाठी हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याचा हक्कदार होता. या निष्कर्षावर पोहोचल्यानंतरही उच्च न्यायालयाने अंमलबजावणीची कार्यवाही तहकूब करण्याचा खालील दोन्ही न्यायालयांचा निर्णय कायम ठेवला. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा तार्किक निकाल असा आहे की प्रमाणपत्र टिकून आहे (वैध राहते) आणि अंमलबजावणीचा अर्ज योग्य प्रकारे करण्यात आला आहे आणि धनकोला दावा केलेला दिलासा मिळण्याचा हक्क आहे. परंतु, असे असूनही असे मानले गेले आहे की, निबंधक कार्यवाहीला स्थगिती देऊ शकतात. आम्हाला असे वाटते की, दिवाणी न्यायालयाला प्रलंबित असलेल्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीला स्थगिती देण्यास सांगणारे निबंधकाचे कृत्य हे अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाच्या अधिकारांवर स्पष्ट अतिक्रमण आहे आणि ते त्याच्या वैधानिक अधिकारांच्या पलीकडे आहे आणि त्यामुळे न्यायालयांनी त्याकडे दुर्लक्ष करायला हवे होते.

मददगार नाझीमने पाठवलेल्या मूळ प्रमाणपत्रामध्ये अस्तित्वात असलेला दोष दूर करण्यासाठी नाझीमने नवीन प्रमाणपत्र जारी केले होते, या कारणास्तव या प्रकरणात कोणतेही योग्य प्रमाणपत्र नव्हते आणि त्यामुळे अंमलबजावणीची प्रक्रिया अधिकार क्षेत्राशिवाय होती या विद्वान वकिलांच्या युक्तिवादाचा विचार करणे अनावश्यक आहे.

परिणामी, हे अपील मंजूर करण्यात येत आहे, खालील तिन्ही न्यायालयांचे निर्णय रद्द केले जात आहेत आणि अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाला, निबंधक कार्यालयाकडून प्राप्त

झालेल्या पत्राद्वारे ज्या टप्प्यावर त्यात हस्तक्षेप करण्यात आला त्या टप्प्यापासून हुकुमनामा अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले जातात. या प्रकरणाच्या परिस्थितीत आम्ही संपूर्ण कार्यवाहीच्या खर्चाबद्दल कोणताही आदेश देणार नाही.

अपील मंजूर.

---------

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

---------